

**एन.नविन सोना**(भा.प्र.से.)

**जिल्हाधिकारी, वर्धा**

# <u>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र</u>

# <u>वर्धा जिल्हा</u>

# <u>यशोगाथा</u>

स्वातंत्र्य संग्रामाचे केन्द्रस्थान, भुदान यज्ञाचे प्रेरणास्थान अशी ओळख वर्धा जिल्हयाची आहे. क्षेत्रफळात आणि लोकसंख्येत कमी असा हा जिल्हा, गेल्या काही वर्षात शेतकरी - शेतमजूर यांचे आत्महत्येमुळे प्रसिध्दीस आला. सिंचनाच्या पर्याप्त सोयी नसल्याने, जिरायती शेतीवर अवलंबून कास्तकार उपजिविका करतात. जिल्हयात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या अत्यल्प असल्याने रोजगाराच्या संधी पर्याप्त नाहीत. सन १९७७ पासून जिल्हयात रोजगार हमी योजना आणि सन २००७ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कार्यन्वित आहे.

**<u>योजना सुरु झाल्यापासून योजनेअंतर्गत माहीती</u>**

| सन | मजूरीवरील खर्च (अकुशल) लाखात | साहित्यावरील खर्च (कुशल) लाखात | एकुण खर्च लाखात | निर्माण माुष्यदिन |
|---|---|---|---|---|
| 2007-2008 | 64.00 | 26.67 | 90.67 | 122935 |
| 2008-2009 | 80.21 | 12.72 | 100.89 | 79833 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2009-2010 | 153.99 | 17.67 | 182.35 | 110281 |
| 2010-2011 | 156.83 | 56.55 | 213.38 | 152253 |
| **2011-2012** | **1637.64** | **851.80** | **2489.44** | **1037081** |
| **2012-2013** | **1915.04** | **1412.13** | **3327.17** | **1164535** |

या पार्श्वभुमीवर सन २००८-२००९ पासून योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. योजनेच्या अंमलबजावणीतील मागील अनुभव लक्षात घेऊन खालील प्रमाणे नियोजनपुर्ण कार्यवाही करण्यात आली. आज वर्धा जिल्हा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत अग्रेसर आहे.

## १. जनजागृती आणि लोकसहभाग

सन २००७-२००८ मध्ये या योजने अंतर्गत मोठया प्रमाणावर कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली. परंतू मजुरांच्या अत्यल्प प्रतिसादामुळे योजनेला पुरेसा पाठींबा मिळाला नाही. त्यामुळे सन २०११ पासून सर्व लोकप्रतिनिधी अधिकारी कर्मचारी यांच्या कार्यशाळा घेण्यात आल्यात. प्रत्येक तालुक्यामध्ये सरपंच, उपसरपंच लोकप्रतिनिधी सामाजिक संस्था यांचे शिबीरे घेण्यात आले. ग्रामीण पातळीवर सर्वाना योजना सुलभ व्हावे याकरिता मार्गदर्शक पुस्तीका तयार करण्यात आली.



कार्यशाळा आणि शिबीराचे आयोजनातून शासनाचे निर्णय, योजनेचा आराखडा व करणास्तवर गावास असलेले अमर्याद अधिकार व योजनेची अंमलबजावणी याबाबत सोप्या शब्दात सर्वापर्यत पोहचविण्यात आलेत. प्रत्यक्ष कामे करणा-या मजूराचे शंका निरसन करण्यात आले. योजनेतील पारदर्शकता, सामाजिक अंकेक्षण मजुरांना आणि लोकप्रतिनिधीना अवगत करण्यात आली. मजुरांना आश्वस्त करण्यात आले की, त्यांचे मजुरीचे शोधन पोष्ट ऑफीस किंवा अधिकोषामार्फत होणार असल्याने त्यांना कमी मजुरी मिळणार नाही. त्यांचे मजुरीचा अपहार होणार नाही. तसेच त्यांचे मजुरीचे शोधन निर्धारित मुदतीत पोष्ट-अधिकोष मार्फत करण्यात येणार आहे.

प्रत्येक गावात मजुरांची उपलब्धता होण्याचे दृष्टीने द्रारिद्र रेषाखालील कुटुंबे अल्प भुधारक यांना विशेषत: प्रोत्साहीत करण्यात आले. स्थानिक स्वंयसेवी संस्थाना योजनेच्या प्रसार आणि प्रसिध्दी मध्ये सहभागी करुन घेतले प्रसंगी जास्तीत जास्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी पुरस्कृत करण्यात आले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मधील कामामुळे मोठया प्रमाणावर कायम स्वरुपी मत्ता तयार होते आणि ही मत्ता ग्रामोपयोगी सार्वजनिक स्वरुपाची असल्याने गावाचे विकासात महत्वपुर्ण ठरत असल्याची जाणीव करुन देण्यात आली. या जाणिवेतून देखिल योजनेच्या यशस्वीतेसाठी लोकांनी प्रतिसाद दिला.

वर्धा जिल्हा कृषीप्रधान असून मोठया क्षेत्रामध्ये उद्योग सेवा क्षेत्र अथवा पुरक व्यवसायांचा पुरेसा विकास न झाल्याने जिल्हयातील मजुरांना कामाची निश्चितपणे गरज आहे. यांची जाणीव सर्व कार्यकारी यंत्रणांना करुन देण्यात आली. जिल्हयातील आष्टी, कारंजा, आर्वी, समुद्रपूर आदिवासी बहुल तालुके आहेत. या तालुक्यात वनक्षेत्र जास्त आहे. अशा दुर्गम अविकसीत भागातील मजुरांना कामाची आवश्यकता जास्त आहे. या दृष्टीने सर्व कार्यकारी यंत्रणांना या तालुक्यात जास्तीत जास्त कामे घेण्यास कार्यप्रविण करण्यात आले. या योजनेवरील मजूरामुळे कृषी प्रधान कामावर विपरीत परिणाम होणार नाही यांची जाणीव ठेवून नियोजन करावे आणि ग्रामीण जनतेला/कास्तकारांना विश्वासात घेवून कामाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. यामुळे जनतेचा रोष झाला नाही.

## <u>२. लोकाभिमुख सुयोग्य नियोजन</u>

### <u>सिंचनाची सोयी</u>

वर्धा जिल्हयात योजना कार्यान्वित करणे आणि लोक सहभाग वाढविणे या दृष्टीने नियोजनात लोकाभिमुख कामांचा प्राधान्याने समावेश करण्यात आला. अल्प भुधारकांना खरीप आणि रबी पिकासाठी सिंचनाची सोय व्हावी यास्तव प्रत्येक ग्रामपंचायतीत विहीरीची कामे मोठया प्रमाणात घेण्यात आलीत. समाजातील दुर्बल घटकांना मोठा लाभ होणार असल्याने त्यांचा सहभाग वाढला आहे. या योजनेतून विहीर पुनर्भरणाचा कामांचा समावेश करण्यात आल्याने भविष्यात भुजल पातळीत वाढ होईल आणि यांचा लाभ सर्वापर्यत पोहचणार आहे.जिल्यामध्ये सिंचनाची व्यवस्थेबाबत घेण्यात आलेल्या सिंचन विहीरीच्या कामाची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| एकुण ग्रामपंचायती | विहीरीचे लक्षांक | तांत्रीक मान्यता | प्रशासकीय मान्यता | सुरु कामांची संख्या | पुर्ण झालेल्या विहीरी |
|---|---|---|---|---|---|
| ५१७ | ५१७० | ४२३५ | ४२३५ | १६२९ | ९०० |

हि योजना वैयक्तीक लाभाची असुन यामुळे ५१७० लाभार्थीना कायमस्वरुपी सिंचनाचा लाभ मिळणार आहे.अंदाजे १० हजार हेक्टर जिरायती जमिन बागायत करण्यास मदत होईल. विविध योजनेखाली विद्युत पुरवठा, विद्युत मोटार, पाईप लाईन, ड्रीप, स्प्रिंकलर इत्यादी साहय्यभुत सुविधा सोबत पुरविण्याचे काम प्रगती पथावर आहे.










## <u>शेततळे व इतर योजना</u>

ढाळीचे बांध, शेततळे पाटस-या इत्यादी जलसंधारण कामामुळे रोजगाराच्या संधी उपलब्धतेसोबत दुष्काळाचा सामना करण्याचा दुहेरी उद्देश साध्य होत आहे. जिल्हयात जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात समावेश करण्याचे नियोजन आहे.चालु वर्षात जलसंधारणाची कामे खालील प्रमाणे झालेली आहे.

| ढाळीचे बांध | विहीर पुर्नभरण | शेततळे | शोषखडडै | तलावातील गाळ काढणे |
|---|---|---|---|---|
| १५ | ९५ | २३ | २० | ५ |



## पांधन रस्ते

जिल्हयातील पांदन रस्ते वर्षानुवर्षे दुरावस्थेत आहेत. काटेरी झुडपे यामुळे निरुंद रस्ते, वाहतुकीस अयोग्य होते. मोठया प्रमाणावर पांदण रस्त्यांचे मजबुतीकरणामुळे लोकांचा जिव्हाळयाचा प्रश्न मार्गी लागत आहे. सुवर्ण जयंती राजस्व अभियान अंतर्गत शिवाय लोकसहभागातून पांदण रस्ते अतिक्रमण मुक्त होत आहेत. कृषी उत्पनाची वाहतूक आणि व्यवस्थापन सुलभ झाले आहे. चालु वर्षात पांधन रस्त्याची कामे खालील प्रमाणे झालेली आहे.

| एकुण ग्रामपंचायत | मंजुर पांधन रस्ते | चालु वर्षात सुरु झालेली पांधन रस्ते | किलोमिटर |
|---|---|---|---|
| ५१७ | ६२२ | २१५ | ६२२ |




**<u>फळबाग लागवड</u>**

समाजातील दुर्बल अल्प भुधारकांच्या शेतात फळबाग लागवडीचा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. लोकांच्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे नियमीत वार्षिक आर्थिक स्त्रोत्रासोबत फळझाडे पिकाखालील क्षेत्र विस्तार साध्य होत आहे.सन २०१२ चे पावसाळयात फळबाग लागवडीचे लक्षांक खालील प्रमाणे आहे.

| फळबाग लागवडीचे लक्षांक | निवड शेतकरी संख्या | लाभार्थी संख्या | क्षेत्र हेक्टरमध्ये |
|---|---|---|---|
| ११०४००० | ३०९७८ | २०७०० | १२६५ |

**<u>वृक्षलागवड</u>**

पर्यावरण -हास, प्रदुषण आणि पाण्याचे दुर्भिक्ष या तिहेरी संकटावर मात करण्यासाठी शतकोटी वृक्ष लागवड योजने अंतर्गत मोठया प्रमाणावर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये नागरिक ग्रामपंचायत अशासकीय संस्था औद्योगिक प्रतिष्ठाने सर्व शासकीय विभाग इत्यादी यांना सहभागी करुन घेण्यात आले आहे. वृक्ष लागवडीची कामे मुख्यत: अकुशल स्वरुपाची असल्यामुळे इतर कुशल कामावरील खर्चात वाढ करणे शक्य झाले आहे. यामुळे जिल्हयातील कुशल व अकुशल खर्चाचे प्रमाण सुयोग्य राहणे शक्य झाले आहे. जिल्हयाचे वृक्ष अच्छादीत क्षेत्र वृध्दी करण्यासाठी अवनत झुडपी जंगले, उजाड टेकडया इत्यादी जमिनी हरित करण्याचे लक्ष आहे. सन २०१३ पावसाळयात वृक्ष लागवडीचे लक्षांक खालील प्रमाणे आहेत.

| उदिष्टै (लाखात) | जागेची निवड | एकुण रोपवाटीका | उपलब्ध रोपे | प्रशा.मान्यता |
|---|---|---|---|---|
| ४२.०० | १००० | ५२२ | ८५.३४ | |



## राजीव गांधी सुविधा केन्द्र

ग्रामस्थांचे सार्वजनिक आणि वैयक्तीक उपयोगितेच्या दृष्टीने प्रत्येक ग्राम पंचायतमध्ये राजीव गांधी भवन निर्माण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. प्रत्येक गावात शैक्षणिक, सांस्कृतीक, धार्मीक आणि समाज उपयोगी कारणास्तव एका सार्वजनिक वस्तूची गरज ओळखून, बांधकामासाठी जमिनी उपलब्धता प्राधान्याने करुन घेण्यात येत आहे. सन २०११-२०१२ या वर्षात घेण्यात आलेल्या राजीव गांधी सेवा केन्द्राची संद्यास्थिती खालील प्रमाणे आहे.

| एकुण ग्रामंपचायती | मंजुर राजीव गांधी सुविधा केन्द्र | सुरु राजीव गांधी सुविधा केन्द्र | पुर्ण झालेली राजीव गांधी सुविधा केन्द्र |
|---|---|---|---|
| ५१७ | २५ | २२ | ८ |



( तालका समुद्रपुर व हिगणघाट येथील राजीव गांधी सेवा केन्द बांधकाम)

## निरीक्षण

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मजुरांना काम उपलब्ध करुन देण्याचे उदिष्टे न ठेवता झालेले कामे गुणवत्ता पुर्ण राहावी या करिता तांत्रीक पथकामार्फत कामांना वेळोवेळी भेटी देण्यात आल्या त्यामुळे दर्जेदार मत्ता निर्माण होण्याचे उदिष्टै साध्य करता आले.चालु वर्षात १५० निरीक्षण करण्यात आली.



## फलश्रुती

योजनेअंतर्गत विविध कामाचा आणि निर्माणाधिन मनुष्यदिवसाचा आलेख सतत उंचावत आहे.दृष्टक्षेपात सन  २०१२-२०१३ मध्ये जिल्हयाची उदिष्टैपुर्ती संक्षिप्त स्वरुपात खालील प्रमाणे आहे.

| मजुरीवरील खर्च | साहीत्यावरील खर्च | प्रशासकीय खर्च | एकुण खर्च | निर्माण मनुष्यदिन |
|---|---|---|---|---|
| १९१५.०४ | १४१२.१३ | २०४.०० | ३५३१.१७ | ११.६४ |

| मंजुर कामे | सुरु झालेली कामे | पुर्ण कामे | मजुर उपस्थिती |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ४४८१ | १८२२ | ५६२ | ९००० |

सन १९७७ पासुन जिल्हयात रोजगार हमी योजना कार्यान्वीत आहे परंतु योजनेला अल्प प्रतिसाद मिळाला योजनेची प्रभावी अंमलबजावणी जनतेने दाखविलेला विश्वास आणि अधिकारी कर्मचारी यांचे कार्यनिपुणतेमुळे सन २०१२-१३ मध्ये जिल्हा प्रशासनाला नेत्रदिपक प्रगती साध्य करता आली.

| Year | Household | Persondays Generated |
|---|---|---|
| 2007-08 | 3964 | 122935 |
| 2008-09 | 4954 | 79833 |
| 2009-10 | 4018 | 110281 |
| 2010-11 | 3412 | 152253 |
| 2011-12 | 30518 | 1037081 |
| 2012-13 | 31610 | 1164535 |




भविष्यातील नियोजनात या जिल्हयातील पाणी टंचाई असलेल्या गावामध्ये व्यापक जलसंवर्धन कामे घेण्यात येणार आहे. भविष्यात हि गावे टॅकर मुक्त व्हावी असा सर्वकस प्रयत्न जनतेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नाला जनतेकडून भरघोस पाठिंबा मिळेल असा विश्वास आहे. दुष्काळी परिस्थिती पाण्याच्या प्रश्नासोबत जनावराच्या चा-यांचा प्रश्न उपस्थित होतो. अल्पभुधारकांना दुग्ध व्यवसाय त्यांच्या उपजिविकेत सहाय्यभुत आहेत. यांची जाण ठेवून मोठया प्रमाणावर वैरण सांधन संपतिचा विकास योजना राबविण्यात येणार आहे. जनावराच्या खाण्यास योग्य गवत प्रजाती आणि वैरण देणारे वृक्ष प्रजातीची लागवड करुन प्रत्येक गाव वैरण पुरवठा करण्यास स्वयमपुर्ण व्हावे. असे नियोजन करण्यात येत आहे.

## ३. प्रशासकीय सुधारणा आणि परिणामकारक नियंत्रण

योजनेची गतीमान पध्दतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी तहसिलदार आणि गट विकास अधिकारी यांना अतिरिक्त तांत्रिक मनुष्यबळ स्थापत्य अभियंता, कृषी पदवीधर सेवानिवृत्त वन अधिकारी इत्यादी यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक केली. त्यामुळे कामांचे प्राकलन करणे मोजमाप करणे इत्यादी कामे जलद गतीने करता आलीत.कामाची गतीमानता अबाधित ठेवण्यासाठी तहसिलदार,गटविकास अधिकारी यांना पुरेसे सगणक,झेरॉक्स मशीन, टेबल, खुर्ची, स्टेशनरी, यु.पि.एस ईत्यादी मुलभुत सुविधा प्रशासकीय खर्चातुन पुरविण्यात आल्या. नियुक्त केलेले बाहस्थ कर्मचारी यांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| ए.पि.ओ. | पॅनेल तांत्रीक अधिकारी बांधकाम | पॅनेल तांत्रीक अधिकारी कृषी | से.नि. अधिकारी | डाटा एन्ट्री ऑपरेटर | एम.आय.एस. कॉटीनेटर |
|---|---|---|---|---|---|
| ९ | ३८ | २७ | ५ | १९ | १ |

या योजनेमध्ये जास्तीतजास्त कामे ग्रामपंचायती मार्फत करण्यात येत असल्याने प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये १ याप्रमाणे एकुण ५१७ ग्रामरोजगार सेवक नेमण्यात आलेत.ग्रा.रोजगार सेवक यांना २.२५ टक्के मानधन वेळेवर अदा करुन त्यांना कार्यप्रवण करण्यात आले.

कार्यक्रम अधिकारी आणि सह कार्यक्रम अधिकारी यांचे नियमीत कामाचा व्याप पाहून सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कंत्राटी तत्वावर नेमण्यात आलेत. जिल्हाधिकारी कार्यालय, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, यांचे कामावर विशेषत्वाने लक्ष देते. यामुळे मजुरांना कामे उपलब्ध करुन देणे, तांत्रिक मनुष्यबळाचे कामावर लक्ष ठेवणे, वेळेवर मजुरी वाटप संगणकावर एम.आय.एस. ची माहिती भरणे इत्यादी बाबी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी उपयुक्त ठरल्यात. केन्द्र आणि राज्य शासनाचे निर्देशनुसार एम.आय.एस. वर अचूक आणि नियमीतपणे माहिती भरणे, आवश्यक भासल्यास अतिरिक्त संगणक पुरविणे किंवा अतिरिक्त संगणक चालक बसविणे इत्यादी परिणामकारक अंमलबजावणीमुळे केन्द्र व राज्य शासनाकडून वेळेवर निधी प्राप्त झाला. परिणामी मजुरी वाटप निर्धारित वेळेत करणे शक्य झाले.

## एम.आय.एस.बाबत प्रगती

| सन २०११-१२ चा खर्च | सन २०११-१२ च्या एम.आय.एस.नोंदी | टक्केवारी |
|---|---|---|
| ३५३१.१७ | ३५३१.१७ | १०० |



तालुकास्तरावर मासिक सभा आयोजीत करुन पदाधिकारी अधिकारी तांत्रिक पॅनेल अधिकारी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी ग्राम रोजगार सेवक यांचेशी संवाद साधून कार्यक्रम अंमलबजावणीतील त्यांच्या अडचणी समजून घेतल्यात. बहुतांश अडचणीचे निराकरण तात्काळ करण्यात आले. सर्व स्तरावर समन्वय असावा या दृष्टीने मार्गदर्शन करण्यात आले. तात्काळ अडचणी निवारणार्थ जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क करण्याचे निर्देश देण्यात आलेत.

हजेरी पत्रके व मजुरांची मजूरी तात्काळ वाटप होण्यासाठी परिणाम कारक नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मजुरांना त्याचे गावातच मजुरी मिळावी म्हणुन बँक ऑफ इंडीया मार्फत बि.सी.माडयुल नेमण्यात आलेले आहे.मजुरांचे जॉबकार्ड क्रमांक,बँक खाते क्र.यांची सांगड घालुन आधार कार्डच्या माध्यमातुन डिजीटल ओळख पत्र करुन मंजुरी प्रदान केली जाणार आहे.त्यामुळे मजुरांचे प्रवास खर्च,कामात पडणारा खंड याची बचत होणार आहे.प्रायोगिक तत्वावर आष्टी तालुका नेमण्यात आला असुन येत्या काही कालावधीत सर्व तालुक्यात हि सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच कामाचे प्राकलन मोठया प्रमाणावर करावे लागतात. रोज मजूरीचे वाढीमुळे सुधारीत अंदाज पत्रके तयार करावी लागतात. कामाचा व्याप आणि तात्काळता लक्षात घेवून सर्व कार्यकारी यंत्रणाना नवीन सॉफ्टवेअर पुरवठा करण्यात आलेला आहे. या सॉफ्टवेअर मुळे कामात गती व अचुकता साध्य करणे सोईचे होईल.

**<u>विशेष आभार</u>**

महाराष्ट्र मा. मुख्य सचिव यांचे कुशल नेतृत्वात, मा. प्रधान सचिव मग्रारोहयो यांचे मार्गदर्शनात आणि मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांचे सातत्याने प्रोत्साहानामुळे जिल्हा प्रशासनाला लंक्षाक पुर्ती करण्यात बळ मिळाले. योजनेच्या अंमलबजावणीत उद्‌भवणा-या अडचणीचे निराकरण वेळीच होत गेल्याने गती कायम ठेवता आली. भविष्यात आज निर्माण करण्यात आलेले वातावरण कायम ठेवून, रोजगाराच्या संधीत वाढ करणे द्रुष्य अद्रुष्य स्वरुपात लाभ पोहचविणे आणि मजुरांच्या कुटुंबाचे शिक्षण, आरोग्य एकूण जिवनमान उंचावण्याचे उद्देषाने वर्धा जिल्हा वाटचाल करित आहे.

## ***मनोगत***

*सन २०१२-२०१३ मध्ये वर्धा जिल्हयातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत यशस्वीतेसाठी जिल्हयातील लोकप्रतिनिधी, नागरीक, अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटी कर्मचारी यांचे सहकार्य कारणीभुत आहे.मी याबाबत सर्वाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि आभार मानतो.*

*कुटुंबाची नोंदणी,रोजगार उपलब्ध करणे नियोजन आराखडा व कामाचा प्राधान्यक्रम ठरविण्यात सर्व ग्रामपंचायतीनीं त्यांची जवाबदारी कर्तव्यनिष्ठेने पुर्ण केली कायद्याच्या अंमलबजावणीची प्रार्थमिक जवाबदारी ग्रामपंचायतीने पुर्ण केल्याने,पंचायत राज संस्थावर शासनाने सोपविलेली जवाबदारी सार्थ ठरली आहे.सर्व कुटुंबाना रोजगार पुरविणे,ग्रामउपयोगी मालमत्ता निर्माण करणे इत्यादी योजनेच्या उदिष्टांची पुर्तता करणेसाठी आमच्या अथक परिश्रमाची गरज आहे.याची जाणीव ठेवुन योजनेच्या नियोजनातील आणि अंमलबजावणीतील त्रुटी निरसन करुन आम्ही योजनेच्या यशस्वीतेसाठी कटिबध्द आहोत.*

*मा.मुख्य सचिव म.राज्य,मा.प्रधान सचिव रो.ह.यो.,मा.विभागिय आयुक्त नागपुर विभाग नागपुर आणि मा.जिल्हाधिकारी वर्धा यांचे सहकार्य आणि मार्गदर्शनामुळे योजनेची अंमलबजावणी उदभवलेल्या अडचणीवर मात करणे शक्य झाले.सभा अणि व्हीडीओ कॉन्फरंन्सीची उपयुक्तता योजनेच्या अंमलबजावणी साठी सार्थ ठरली.*

*पुन:श्च सर्वाचे मनपुर्वक आभार मानुन पुढील योजनेच्या यशस्वी वाटचाली साठी सहकार्याची अपेक्षा करतो.*

एन. नविन सोना
जिल्हाधिकारी वर्धा